ईश्वर टी अ‍ॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही. शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३२४ वा • शनिवार, ता. ७ जून २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# राजळे, घुले पाठोपाठ अ‍ॅड. ढाकणे देखील महायुतीच्या वाटेवर ?

## राष्ट्रवादीच्या आ. शिवाजीराव गर्जे यांच्या भूमिकेकडे लक्ष



**पाथर्डी । नितीन गटाणी**

शेवगाव मतदारसंघातून विजयाची हॅट्रिक करून आपला गड अभेद्य ठेवणाऱ्या आमदार मोनिका राजळे, तेवढ्याच तोलामोलाचे कट्टर व पारंपारिक विरोधक असणारे राष्ट्रवादीचे नेते अ‍ॅड.प्रताप ढाकणे यांची भाजपामध्ये होत असलेल्या प्रवेशाबाबतची जोरदार चर्चा, सत्तेत असो वा नसो शेवगाव तालुक्यामध्ये सातत्याने आपले वर्चस्व अबाधित ठेवणारे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे माजी आमदार चंद्रशेखर घुले व त्यांच्याच पक्षाचे व मागील चार महिन्यापूर्वी विधानपरिषदेवर वर्णी लागलेले आ.शिवाजीराव गर्जे अशा महायुतीच्या कचाट्यात हा मतदारसंघ सापडल्याने कार्यकर्त्यांसह मतदार देखील गोंधळात पडल्याचे आजचे राजकीयदृष्ट्या विचित्र परंतु वास्तविक चित्र सध्या निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ही कशा पद्धतीने लढवली जाईल, याचा कुठलाही अंदाज सध्या पाथर्डी - शेवगाव मतदारसंघात बांधला जाऊ शकत नसल्याने प्रचंड गोंधळाचे वातावरण सध्या या ठिकाणी निर्माण झाले आहे. भाजपाच्या आमदार मोनिका राजळे यांनी सलग तिसऱ्यांदा निवडून येत विजयाची हॅट्रिक केली आहे. यामुळे त्यांचे पारडे आज तरी सर्वाधिक जड दिसत आहे. भाजपाची उमेदवारी आपणाला मिळाल्यास विजय नक्की अशीच काहीशी परिस्थिती सध्या निर्माण झाल्याने अनेक इच्छुक उमेदवार देव पाण्यात घालून बसले आहेत. मात्र इच्छुकांची भाऊगर्दी जशी सर्वाधिक प्रमाणात भाजपाकडे आहे. त्याच पद्धतीने उमेदवारी वाटपानंतर बंडखोरी व नाराजांची संख्या त्याच तुलनेत वाढण्याची देखील शक्यता नाकारता येणार नाही. बंडखोरीसह नाराजीनाट्य थोपवण्यास आमदार राजळे यांना यश आले नाही तर, अनपेक्षित मोठा फटका भाजपाला या मतदारसंघात बसू शकतो, यात तीळ मात्र शंका नाही. दुसरीकडे गतविधानसभेला दोन नंबरची मते घेणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. प्रताप ढाकणे यांच्या भाजपा प्रवेशाची चर्चा गेल्या काही दिवसात जोर धरू लागली आहे. काही वृत्तपत्रात याविषयी बातम्या देखील प्रकाशित होत आहेत. अद्याप मात्र अ‍ॅड. ढाकणे यांनी याचे कुठेही जाहीरपणे अथवा वृत्तपत्राच्या माध्यमातून खंडन केलेले नाही. यामुळे अ‍ॅड. ढाकणे यांनी भाजपा प्रवेश केल्यास आमदार राजळे व अ‍ॅड. ढाकणे यांचे मनोमिलन होऊन भाजपाचे एकच संयुक्तिक पॅनल राहणार की, दोघांचेही स्वतंत्रपणे पॅनल होऊन मैत्रीपूर्ण लढत होणार, अशी देखील उलटसुलट चर्चा आता जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे पक्ष प्रवेशाच्या घडामोडीच्या पार्श्वभूमीवर अ‍ॅड.ढाकणे यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्यांची देखील आता धाकधूक वाढताना दिसत आहे. यामुळे अ‍ॅड.ढाकणे यांच्यासोबत किती कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातून बाहेर पडणार व किती कार्यकर्ते पक्षातच राहणार, हे देखील महत्त्वाचे ठरणार आहे. तर विधानसभेला तिसऱ्या नंबरची लक्षणीय मते घेणारे व याच मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या भूमिकेकडे देखील लक्ष लागले आहे. शेवगावमध्ये सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रामधील योगदान पाहता त्यांचे शेवगाव तालुक्यावरील वर्चस्व कोणीही नाकारू शकत नाही. अशातच मागील चार महिन्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून विधान परिषदेवर वर्णी लागलेले व पक्षाचे सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांना सोबत घेऊन पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी माजी आमदार घुले यांनी प्रयत्न करावे, यासाठी त्यांच्या दोन्ही तालुक्यातील कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. आमदार गर्जे यांची भूमिका आमदार राजळे यांच्या विरोधात राजकीय संघर्ष करण्याची नसली तरी देखील मा.आ. घुले यांचे समर्थक पक्षवाढीच्या नावाखाली स्वतंत्र पॅनल करण्याची मागणी आमदार घुलेकडे करत आहेत. आमदार राजळे व अ‍ॅड. ढाकणे अशा दोन्हीही राजकीय विरोधकांना एकाच वेळी शह देता येईल अशी चर्चा देखील त्यांचे समर्थक दबक्या आवाजात करताना सध्या दिसत आहेत. मा.आ. घुले यांना देखील राजकीय अस्तित्व व त्यांच्या कार्यकर्त्यांची फळी मजबूत ठेवायची असल्याने ते देखील वरिष्ठ पातळीवरून मैत्रीपूर्ण लढतीसाठी प्रयत्नशील राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.जर- तरच्या भानगडीत भाजपच्या आमदार मोनिका राजळे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार शिवाजीराव गर्जे व माजी आमदार चंद्रशेखर घुले यांच्यासह अ‍ॅड. प्रताप ढाकणे हे देखील भाजपामध्ये आल्यास आपोआपच मतदारसंघातील सर्वच मातब्बर नेते महायुतीचे असणार आहेत. अशी अतिशय अनाकलनीय परिस्थिती निर्माण झाल्यास पाथर्डी- शेवगाव मतदारसंघात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विरोधी विचारांचा नागरिक, मतदार व कार्यकर्त्यांचा वाली कोण हे देखील पाहणे मोठे औत्सुक्याचे राहणार आहे. सर्व मातब्बर नेते महायुती म्हणून एकाच छताखाली आले तर त्यांना विरोध करणे देखील वाटते तितके सोपे राहणार नाही. मात्र महायुतीचेच वरीलप्रमाणे तीन पॅनल स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकीत निर्माण झाल्यास मत विभागणीचा फायदा विरोधी आघाडीच्या उमेदवाराला होईल, हे देखील नाकारून चालणार नाही. तरी देखील वरीलप्रमाणे महायुतीचे चित्र निर्माण झाल्यास विरोधी आघाडीची मोट कोण बांधणार व ती आघाडी कितपत यशस्वी ठरणार यावर देखील पाथर्डी शेवगाव- मतदार संघातील आगामी राजकीय समीकरणे अवलंबून राहणार एवढे मात्र नक्की...

**मागील १३ ते १४ वर्षाच्या राजकारणामध्ये अतिशय शांत व संयमी भूमिका घेणाऱ्या आमदार राजळे यांना आता आक्रमक भूमिका घ्यावी लागणार आहे. प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर अधिक प्रमाणात वचक ठेवावा लागणार आहे.**

**पाथर्डी तालुक्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थांवर आमदार मोनिका राजळे यांचे तर शेवगाव तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर माजी आमदार चंद्रशेखर घुले यांचे वर्चस्व आहे. ते अबाधीत ठेवण्यासाठी दोघांनाही प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे.**

**भाजप प्रवेशाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसापूर्वी शेवगाव येथे झालेल्या देवाभाऊ कुस्ती स्पर्धेतील अ‍ॅड. प्रताप ढाकणे यांची एन्ट्री बरेच काही सांगून जात आहे.**

## विकास पालवे यांचा युरोप खंडात डंका



**सोनई । शनिशिंगणापूर**

वंजारवाडी (सोनई, तालुका नेवासा) येथील रहिवासी विकास पालवे यांनी युरोपमधील सायप्रस येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेत भारताचे अधिकृत प्रतिनिधित्व केले. नेवासा तालुक्यातील वंजारवाडी या छोट्याशा गावातून आलेल्या विकास पालवे यांनी नुकताच २१ ते २४ मे २०२५ या कालावधीत सायप्रस (युरोप) येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या सस्टेनेबिलिटी आणि सर्क्युलर इकॉनॉमी या उच्चस्तरीय जागतिक परिषदेत भारताचे अधिकृत प्रतिनिधित्व केले. या परिषदेमध्ये टिकाऊ विकास आणि परिपत्रक अर्थव्यवस्थेच्या रणनीतींवर आंतरराष्ट्रीय नेते, तज्ज्ञ आणि धोरणकर्ते एकत्र आले होते. विकास पालवे यांनी ई-कचऱ्याचे व्यवस्थापन आणि सर्क्युलर इकॉनॉमी मॉडेल्स यावर नाविन्यपूर्ण प्रस्तुती दिली. त्यांच्या पुढारलेल्या विचारसरणीला आणि कृतीशील सूचनांना जागतिक समुदायाकडून मोठे कौतुक मिळाले. ताईसाहेब कदम कन्या विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक बाळासाहेब पालवे यांचे ते चिरंजीव आहेत. या राष्ट्रीय परिषदेत अमेरिका ऑस्ट्रेलिया जर्मनी ब्राझील चीन आफ्रिका आदी देशासह एकूण ९० देशातील प्रत्येकी एक प्रतिनिधी उपस्थित राहून सहा दिवसीय परिषदेत संशोधनाचा डंका झाला. ग्रामीण महाराष्ट्रातील साध्या पार्श्वभूमीपासून आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचलेला विकास पालवे यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे. त्यांनी २०२१ मध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली असून, आज ते ग्रामीण भारतातील तरुणांसाठी प्रेरणेचा स्त्रोत बनले आहेत. ते बाळासाहेब आणि शोभा पालवे यांचे सुपुत्र आहेत. त्यांचे वडील, बाळासाहेब पालवे, हे निवृत्त हायस्कूल शिक्षक आणि समाजसेवक असून, त्यांनी आपल्या भागात शिक्षण आणि सामाजिक विकासासाठी मोठे कार्य केले आहे. विकास पालवे यांचे हे यश केवळ त्यांच्यासाठीच नाही तर त्यांच्या कुटुंबासाठी, वंजारवाडी गावासाठी आणि संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे. त्यांचा प्रवास दाखवतो की दृढनिश्चय, बुद्धिमत्ता आणि समर्पण यामुळे कोणताही अडथळा मोडून प्रगती करता येते. त्यांच्या या कामगिरीचे पंचक्रोशीतील जनतेने कौतुक केले आहे.

## शहाजीराजांच्या संकल्पनेतून जिजाऊंच्या मार्गदर्शनाने स्वराज्य निर्माण केले- जाधव



**पिंपरीचिंचवड । प्रतिनिधी**

रयतेच्या स्वराज्य निर्मितीचा शहाजी राजांनी संकल्प केला. राजमाता जिजाऊंच्या मार्गदर्शनाने छत्रपती शिवाजी राजांनी पूर्ण केला.६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर जिजाऊंच्या उपस्थितीत राज्याभिषेक करून शिवाजी राजांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले छत्रपती शिवाजीमहाराज राजे झाले असे प्रतिपादन मराठा सेवा संघ शिक्षक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश जाधव यांनी केले. भक्ती शक्ती समूह शिल्प निगडी येथे मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे जिल्हाध्यक्षा मनिषा हेंबाडे शहराध्यक्षा सुलभा यादव सचिव वृषाली साठे यांच्या हस्ते भक्ती शक्ती समूह शिल्पास पुष्पहार अर्पण करून छत्रपती शिवाजीमहाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे प्रकाश जाधव शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, वसंतराव पाटील,दिलीप गावडे,अशोक सातपुते,सयाजी भांदिगरे,धन्यकुमार जगदाळे, मंगेश चव्हाण,जिजाऊ ब्रिगेडच्या रत्न प्रभा सातपुते,जयंती कदम, कौशल्या जाधव,संध्या भालेराव,वंदना क्षीरसागर, शितल भोसले उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजनासाठी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रवीण कदम,विवेक गायकवाड, साहेबराव साळुंखे,शाम पाटील, राजेश सातपुते,नितिन विधाते यांनी विशेष परिश्रम घेतले.मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. आजही छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या चरित्रातून महिलांशी कसे वागावे, स्वावलंबी कसे बनावे नियोजन व्यवस्थापन कसे करावे याची प्रेरणा मिळते असे प्रतिपादन आबासाहेब ढवळे यांनी मनोगतात व्यक्त केले सूत्रसंचालन दिलीप गावडे यांनी केले तर आभार प्रविण कदम यांनी मानले.

### व्यवस्थेचा बळी ठरलेल्या कुटुंबीयांच्या हस्ते

## ३५१ वा शिवराजाभिषेक सोहळा साजरा




**पुणे । प्रतिनिधी**

कुठल्याही प्रकारच्या सेलिब्रिटी अथवा मान्यवर व्यक्तींना न बोलावता पहलगाम हल्यात शहीद झालेल्या जगदाळे कुटुंबीय, गणबोटे कुटुंबीय, हुंडाबळी प्रकरणातील बळी ठरलेली स्मृतीशेष वैष्णवी हगवने यांच्या कुटुंबातील सदस्य या सर्वांच्या हस्ते छत्रपती शिवरायांना अभिषेक करण्यात आला. राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या कोल्हापूर येथील श्री शिवाजी वैदिक विद्यालयातून अभ्यास करून महंत कैलास वडघुले, कुमारी स्वरा धुमाळ यांनी राज्याभिषेक विधी संपन्न झाला. यावेळी शस्त्र पूजन, धान्य पूजन, फळांचे पूजन, जगद्गुरु संत तुकाराम महाराज्यांच्या गाथेचे पूजन, छत्रपती शिवरायांच्या नित्य वापरात वापरत असलेल्या कवड्याच्या माळीचे पूजन, शिवमुद्रेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी शिल्पकार सुप्रिया शेखर शिंदे, अ‍ॅड. प्राजक्ता मोरे, पत्रकार चंद्रकांत फुंदे यांना शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आखिल भारतीय शिवजन्मोत्सव समितीचे विकास पासलकर यांनी प्रास्ताविक केले. पासलकर म्हणाले व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या या कुटुंबातील सदस्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत हा संदेश शिवराज्याभिषकाच्या निमित्ताने देण्याचा प्रयत्न आखिल भारतीय शिवजन्मोत्सव समितीच्या माध्यमातून करत आहोत. शिवराजाभिषेकासाठी मोहन जोशी, माधव जगताप, संदीप कदम, राजेंद्र डुबल, संदीप खलाटे, निलेश निकम, मारुतराव सातपुते, रमेश गुजर तसेच मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी निलेश इंगवले, अक्षय रणपिसे, सचिन जोशी, मंदार बहिरट, रोहित ढमाले, युवराज ढवळे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन विराज तावरे यांनी केले तर प्रशांत धुमाळ यांनी आभार मानले.

## आत्मनिर्भर गोव्यासाठी युवकांनी शेतीकडे वळावे - मुख्यमंत्री डॉ. सावंत

### शेतीत यांत्रिकीकरण, कृषी पर्यटनावर भर; अ‍ॅग्री क्लिनिक संकल्पना जाहीर



**मडगाव । प्रतिनिधी**

गोवा आत्मनिर्भर करण्यासाठी युवकांनी शेतीकडे वळावे, यासाठी शेती यांत्रिकीकरण, एकात्मिक शेती, कृषी पर्यटन यावर भर देण्यात येत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.राय कुडतरी येथे डॉन बॉस्को सोसायटी व कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम प्रारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री रवी नाईक, फा. जॉर्ज क्वाद्रोस, डॉ. प्रवीणकुमार आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, राज्यातील पडिक जमिनी शेतीखाली आणाव्यात. शेतीत ड्रोन, भातलावणी यंत्र यांसारख्या यांत्रिक साधनांचा वापर वाढत आहे. कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून, गोव्यातील कृषी उत्पादने देशाबाहेरही निर्यात व्हावीत यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अ‍ॅग्री क्लिनिकसाठी कोर्स व कर्ज योजना: शेतीसाठी माती परीक्षण महत्त्वाचे असून, यासाठी साखळी येथे तीन महिन्यांचा कोर्स सुरू होत असून जुलैपासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. यशस्वी प्रशिक्षणानंतर 'अ‍ॅग्री क्लिनिक' उभारणीसाठी कर्ज योजना देखील उपलब्ध असेल. कृषीमंत्री रवी नाईक यांचा संदेश: उच्चशिक्षित युवक शेतीकडे वळत असून, भातशेतीसह आंबा, काजू आदी उत्पादनांसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. कृषी उत्पादनात गोवा आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# रयत समाचार वर्धापन व शिवराजाभिषेक दिन

## रयत कृतज्ञता गौरव सोहळा



शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करताना हभप श्यामसुंदर महाराज सोन्नर, कामिल पारखे, सुभाष गुंदेचा.



नव्या–जुन्या पिढीला जोडणारे इंग्रजी वृत्तपत्राचे ज्येष्ठ पत्रकार कामिल पारखे यांचा अहमदनगरकरांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



हभप श्यामसुंदर महाराज सोन्नर यांचा सन्मान करताना निलीमा बंडेलू समवेत सुभाष गुंदेचा, संध्या मेढे, कामिल पारखे.



माध्यमे आणि अखंड भारत: राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका याविषयी मार्गदर्शन करताना कामिल पारखे.



सोहळ्यास उपस्थित मान्यवर उपसंपादक असिफखान दुलेखान, बाबा जाधव, सॅम्युअल वाघमारे, आबिद खान, फिरोज शेख, राजेंद्र गांधी, उज्वला वाकळे, सबइडिटर मरयम सय्यद, अभिनव बोगावत, अभिजित बोगावत.



माध्यमे आणि अखंड भारत : राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका याविषयी मार्गदर्शन करताना हभप श्यामसुंदर महाराज सोन्नर .



सोहळ्यास उपस्थित मान्यवर प्रा. प्रियदर्शन बंडेलू, प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, डॉ. दिलीप पवार, विजय केदारे, अविनाश कर्पे, विष्णु भुतकर, सतीश सातपुते, निसार शेख, ललिता केदारे, समिक्षा वाकळे, रसिका लायल–चावला, संतोष गायकवाड.



परिसंवादाचे सुत्रसंचालन करताना अहमदनगर महानगरपालिकेच्या निवृत्त प्रसिध्दी अधिकारी निलीमा बंडेलू.



अध्यक्षीय मार्गदर्शन करताना नवामराठाचे ज्येष्ठ संपादक सुभाष गुंदेचा.



सोहळ्यास उपस्थित मान्यवर उपसंपादक दिपक शिरसाठ, निसार शेख, समिक्षा वाकळे, समृध्दी वाकळे, मरयम सय्यद, लहु लोणकर, संदीप पवार, प्रा. अशोक घोरपडे, दत्ता वडवणीकर, रतन गायकवाड, रसिका लायल–चावला, रामदास वागस्कर, अतुल सातपुते, बापु बनकर, अमरनाथ रजपूत.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)




रयत समाचार वर्धापन दिनानिमित्त शिवराजाभिषेक दिन रयत कृतज्ञता गौरव सोहळ्यात रंगलेले परिसंवाद विषय - माध्यमे आणि अखंड भारत: राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका




रयत कृतज्ञता गौरव सोहळ्याचे प्रास्ताविक करताना संपादक भैरवनाथ वाकळे.



एकनाथ गायकवाड यांच्या ग्रंथ स्टॉलवर रमलेले प्रा. डॉ. सुधाकर शेलार आणि जाधव सर.



**आचार्य गुंदेचा पत्रकार भवनाची नूतन वास्तू, पत्रकार चौक, मनमाड रोड, अहमदनगर**



# तीन दशकानंतर विद्यार्थी एकत्र; जुन्या आठवणींना दिला उजाळा

**नगर तालुका । समीर मन्यार**

पुन्हा शाळेत जावे वर्गात बाकावर बसून गप्पा माराव्यात. मित्र-मैत्रिणींना भेटावे. खोडसळपणा करावा खेळाच्या तासाच्या वेळी कबड्डी, खो-खो , लांब उडी, उंच उडी मैदानावर जाऊन खेळ खेळावेत. शिक्षकांना भेटावे गृहपाठ करून आणला नसेल तर हातावर छडी घ्यावी अंगठे धरावे. गणित इंग्रजी तास असेल तर मनात भीती. शिक्षकांच्या मनात असलेला आदरयुक्त धाक अशा जुन्या आठवणींना उजाळा देत हिंगणगाव येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल मधील १९९४- ९५ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल तीन दशकानंतर स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र येत विद्यार्थी दशेचा पुन्हा ३० वर्षानंतर अनुभव घेतला.

शिक्षकांचा आदर सन्मान करत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना कालचा वर्ग आजचा परिवार आपल्यामुळेच उभा आहे हे विद्यार्थ्यांनी शिक्षकांना दाखवून देत स्नेहमेळावा उत्साहात संपन्न केला. यावेळी विद्यालयाचे माजी आदर्श कलाशिक्षक हबीब मन्यार,इसराइल पठाण,जाधव, प्रभाकर शेवाळे, सातपुते , नारायण फलके , खंडागळे , बाबुराव फलके, क्लार्क बाबुराव सोनवणे ,शिपाई लक्ष्मण सोनवणे, मोरे मामा, भिंगारे मामा विद्यालयाचे प्राचार्य जाधव आदींसह माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी रावसाहेब जरे, आशा लांडगे, विशाल कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केले. अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवून जाती दोन दिवसाची संगत रंगत दोन दिवसाची नाती याप्रमाणे आपण काही दिवस शिक्षणासाठी एकत्र येतो परंतु शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जो तो आपापल्या मार्गाने कामधंद्याच्या निमित्ताने निघून जातो परंतु आपण ज्या ठिकाणी शिकलो शिक्षणाचे धडे घेतले यशाच्या शिखरापर्यंत पोहोचलो याची जाण असणे गरजेचे आहे आज आपण सर्व विद्यार्थ्यांनी ही जाण जपत आमच्या सर्व सेवानिवृत्त शिक्षकांचा आदर ठेवत सन्मान केला ही कौतुकाची बाब असल्याचे आदर्श कलाशिक्षक हबीब मण्यार, इसराइल पठाण यांनी सांगितले. स्नेह मेळाव्याचे संयोजन मनोज सोनवणे ,संतोष बाबुराव सोनवणे अतुल पाडळे, संगीता झावरे ,संतोष कचरू सोनवणे, आदींसह माजी विद्यार्थ्यांनी केले होते. ३० वर्षानंतर विद्यालयात आल्यावर मित्रांच्या भेटी गाठी झाल्यानंतर मागे वळून पाहता अनेकांचे जुन्या आठवणीने डोळे पाणवले होते .तर काहींच्या ओठावर हसु ही आले होते. यावेळी दिवंगत शिक्षक व दिवंगत सहकारी मित्रांना श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माझी विद्यार्थ्यांकडून विद्यालयास आठ सिलिंग फॅन देण्यात आली तसेंच अजून भरघोस मदत देणार हा शब्द दिला त्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य जाधव सर यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक रामदास पानसरे यांनी केली सूत्रसंचालन संतोष भिमराज सोनवणे, अर्चना ठाणगे यांनी केले तर आभार चंद्रकांत कोल्हे यांनी मानले.

# हेमंत ओगलेंच्या निधीतून श्रीरामपूरला स्वर्गरथ- ससाणे

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर नगरपरिषदेला आमदार हेमंत ओगले यांच्या स्थानिक विकास निधीतून स्वर्गरथ मिळणार असून याकरिता सुमारे १५ लक्ष रुपयांचा निधी आमदार हेमंत ओगले यांनी दिला असल्याची माहिती माजी उपनगराध्यक्ष करण ससाने यांनी दिली. सध्या श्रीरामपूर नगर परिषदेकडे असलेल्या स्वर्ग रथाची दुरावस्था झाली असुन शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता नवीन स्वर्ग रथाची मागणी गेल्या अनेक वर्षापासूनची होती. श्रीरामपूर शहराची लोकसंख्या जवळपास एक लाखाहून अधिक असून शहराची व्याप्ती देखील मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. एकाच वेळेला अनेक ठिकाणी अंत्ययात्रा असल्यावर नागरिकांची स्वर्ग रथामुळे मोठी अडचण निर्माण होत होती.

हिच जनहिताची मागणी आमदार हेमंत ओगले यांनी लक्षात घेता पहिल्याच वर्षाच्या आमदार स्थानिक विकास निधीतून १५ लक्ष रुपयांचा भरघोस निधी नवीन स्वर्गरथ खरेदी करणे करीता दिला असल्याचे ससाणे यांनी सांगितले. याबरोबर श्रीरामपूर आणि देवळाली प्रवरा नगरपालिका तसेच श्रीरामपूर - राहुरी विधानसभा मतदारसंघातील अनेक महत्त्वपूर्ण विकास कामांना करोडो रुपयांचा निधी आमदार हेमंत ओगले यांनी उपलब्ध करुन दिला असून सदर कामांचे लवकरच भूमिपूजन आणी लोकार्पण होणार असल्याचे ही ससाणे यांनी सांगितले.

# पर्यावरण संरक्षणासाठी संघटन गरजेचे- पद्मश्री पवार

## राळेगणसिद्धी येथे राज्यस्तरीय पर्यावरण कार्यशाळा

**पारनेर । प्रतिनिधी**

राळेगणसिद्धी येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (अहिल्यानगर) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय पर्यावरण कार्यशाळा व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री पुरस्कार विजेते पर्यावरण कार्यकर्ते चैत्राम पवार होते. त्यांनी आपल्या भाषणात पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व पुनर्निर्माणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी धुळे जिल्ह्यात केलेल्या ४८५ बांध, ७०० चेकडॅम आणि आदिवासी स्वयंपूर्णतेसाठीच्या प्रयोगांचा उल्लेख करत, प्रभावी अंमलबजावणीसाठी संघटनाची गरज व्यक्त केली. मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी सांगितले की, राज्यभर



वृक्षारोपण, पर्यावरण कार्यशाळा, संमेलन, पानवठे निर्मिती, प्राणी-पक्ष्यांसाठी पाण्याची सोय यासारखी विविध कामे हाती घेतली जाणार आहेत. कार्यक्रमात जेष्ठ समाजसेवक किसन बाबुराव तथा अण्णा हजारे, वन्यजीव विकास महामंडळाचे सदस्य पद्मश्री चैत्राम पवार, उप प्रादेशिक अधिकारी, पर्यावरण वकील सुरेश लगड, सचिव वनश्री मोरे, प्रसिद्धी प्रमुख महेश पाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आदर्श पर्यावरण शिक्षक पुरस्कार महेश पाडेकर (अगस्ती महाविद्यालय, अकोले) व अमोल चंदनशिवे (एसएसजीएम महाविद्यालय, कोपरगाव) यांना देण्यात आला.कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयास पुन्हा महत्त्व मिळावे यासाठी गुण आधारित मूल्यमापन व परीक्षेची मागणी करण्यात आली. पर्यावरण संमेलनासाठी तीन दिवस कर्तव्य रजा देण्याचा ठरावही करण्यात आला. ऑक्टोबरमधील ९वे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन नांदेड व यवतमाळ जिल्ह्याच्या संयुक्त विद्यमाने होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. सूत्रसंचालन महेश पाडेकर यांनी, तर आभार प्रदर्शन नानासाहेब गोफणे यांनी केले.

# मुरकुटे यांना पक्षात घेऊ नका- भोसले

**श्रीरामपूर । शफीक बागवान**



राजकीय कारकिर्द संपलेल्या आणि नैतिकता नसलेल्या व बलात्काराच्या आरोपाखाली गुन्हा दाखल जामीनावर सुटलेल्या भानुदास मुरकुटे या व्यक्तीला राजाश्रय देवू नका, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र भोसले यांनीउपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ई-मेल द्वारा केली आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांना पाठविलेल्या ई-मेल मध्ये भोसले म्हणाले की, आपण एक लोकप्रिय, कर्तबगार व राज्यावर असीम प्रेम करणारे लोकप्रतिनिधी आहात. आपली मूल्य व तत्वांशी तडजोड न करण्याच्याआपल्यास्वभावामुळे तमाम महाराष्ट्राच्या जनतेचे आपण 'आयकॉन' आहात. परंतु भानुदास मुरकुटे यांच्या शिवसेना पक्षातील प्रवेशाने शिवसेना व आपल्या प्रतिमेला मोठी हानी होऊ शकते. मुरकुटे यांच्या बाबतीत काही माहिती आपणास असणे गरजेचे असल्यामुळे हा पत्रव्यवहार करत असल्याचे भोसले म्हणाले. मुरकुटे हे श्रीरामपूर तालुक्याला लाभलेल्या लोकप्रतिनिधींपैकी सर्वात निष्क्रिय आणि भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधी आहेत. केलेल्या भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्यासाठी तब्बल आठ वेळा त्यांनी आजपर्यंत पक्षांतर केले आहेत. मुरकुटे यांनी पक्षनिष्ठेचे व तत्वाचे राजकारण कधीही केले नाही. १९८० काँग्रेस,१९९० जनता दल,१९९२ पुन्हा काँग्रेस प्रवेश,१९९५ काँग्रेस,१९९९-राष्ट्रवादी काँग्रेस,२००४-शिवसेना,पुन्हा राष्ट्रवादी प्रवेश,२०१२-लोकसेवा विकास आघाडी,२०२२-बी.आर.एस पक्ष (के. सी.आर ,तेलंगणा यांचा) व आता-शिवसेना प्रवेशासाठी धडपड त्यांची चालू असून पक्षात त्यांना घेऊ नका, असेही भोसले म्हणाले.




# निपाणी निमगाव येथे कृषिदूतांचे उत्साहात स्वागत

**नेवासा । विजय खंडागळे**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न कृषी महाविद्यालय सोनई च्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी (कृषिदूत) ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यक्रम अंतर्गत दहा आठवडे चालणाऱ्या या कार्यक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेवासा तालुक्यातील निपाणी निमगाव येथे दाखल होऊन कृषीदुतांचे सरपंच आविनाश चव्हाण, ग्रामविकास अधिकारी सतिश मोटे, सहाय्यक कृषि अधिकारी आर.पी. राऊत, ग्राम महसूल अधिकारी राजश्री गोल्हार तसेच ग्रामपंचायत कर्मचारी आदिनाथ आदमाने व गावकऱ्यांनी स्वागत केले. कृषी पदवी प्राप्त कृषीदूत आकाश गोडगे, गणेश देशमुख, सौरभ गांधले, राहुल भोगे, शिवम चिंधे, अक्षय नरोडे यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभले .दरम्यान विद्यार्थी प्रत्यक्ष गावात जाऊन प्रथम सर्वेक्षण करून शेतकऱ्यांसमोर येणाऱ्या अडचणी, शेतकऱ्यांचे जीवनमान, त्यांचा सामाजिक, आर्थिक स्तर, गावातील पीक पद्धती, नैसर्गिक संसाधने अशा विविध गोष्टींचा अभ्यास करणार आहेत. शेतकऱ्यांना विविध कार्यक्रम घेऊन प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, जिवाणू खतांचा शेतीमध्ये वापर, गांडुळखत निर्मिती, पिकांवर येणारे रोग व किडी तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांवरील उपाय, बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक अशा विविध विषयांवर शेतकरी बंधूंना मार्गदर्शन करणार आहेत. कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेवटच्या चार आठवड्यात विद्यार्थी कृषी आधारित व्यवसाय किंवा उद्योगांमध्ये प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घेतील. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकृष्ण हुरुळे, डॉ. संतोष चौगुले, डॉ.निर्मला विधाते तसेच विषय विशेषतज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का ? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का ? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का ? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे.

गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# चेतन रेपाळे ठरला देवाभाऊ केसरी

## शेवटच्या क्षणी २ गुणांची कमाई करत केली मात

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव येथे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे विजेतेपद पारनेर येथील कुस्तीपटू चेतन रेपाळे याने दोन गुणांनी विजय संपादन केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या मल्लास चांदीची गदा व रोख बक्षीस देण्यात आले. खुल्या गटातील अंतिम सामना चेतन रेपाळे (पारनेर) विरुध्द कौतुक डफडे (पुणे) यांच्यात अत्यंत चुरशीचा झाला. तोडीस तोड बलदंड मल्ल एकमेकांना भिडले होते. सहा मिनीटाच्या कुस्तीत पहिल्या तीन मिनीटाच्या राऊंडमध्ये कौतुक डफडेने १ गुणांची कमाई करुन आघाडी घेतली. दुसऱ्या राऊंडमध्ये चेतन रेपाळे याने आक्रमक खेळी करुन २ गुणांची कमाई केली. शेवटच्या दीड मिनीटात दोन्ही मल्लांनी २-२ गुणांची बरोबरी साधली. पुन्हा रेपाळे याने २ गुण मिळवून आघाडी घेतली. ५० सेकंद असताना डफडे याने २ गुण घेऊन ४-४ ची पुन्हा बरोबरी साधली. ४० सेकंद असताना रेपाळे याने १ व शेवटच्या १५ सेकंदात पुन्हा २ गुणांची आघाडी घेऊन ५-७ गुणांनी विजय संपादन केला.

निमंत्रित कुस्त्यांमध्ये स्पर्धेचे खास आकर्षण ठरलेल्या महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्यात १.५ लाख रुपयांची व महिला विभागात नॅशनल मेडलिस्ट उषा कुमारी विरुद्ध नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती लावण्यात आली. दोन्ही कुस्त्या अत्यंत अटातटीच्या व रंगदार झाल्या. यामध्ये हर्षद सदगीर आणि सोनाली मंडलिक यांनी प्रतिस्पर्धी मल्लाला चितपट करुन विजय संपादन केले. तसेच शिवराज राक्षे याने देखील उत्कृष्ट खेळी करुन विजय मिळवला. उपस्थितांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. तर देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचा विजेता चेतन रेपाळे याला कै. छबु पैलवान लांडगे यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा देण्यात आली. यावेळी स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, नंदू मुंढे, फारुक पटेल, सुनीलभाऊ धोत्रे, पप्पू शिरसाठ, बापूराव चव्हाण, युवराज पठारे, विक्रम बारवकर, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, मगर कडू, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, विक्रम बारवकर, दिपक डावखर, रमेश दारकुंडे, विनोद मोहिते, सालार शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, माजी सैनिक विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभी बडे, अंबू पहिलवान, प्रकाश चित्ते आदींसह संयोजन समितीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेते विविध वजन गटातील स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:- ४२ किलो वजन गट विजयी- प्रणव गुंजाळ (संभाजीनगर), उपविजयी- ओंकार थोरात (बुऱ्हाणनगर), तृतीय- फैसल पठाण (संभाजीनगर). ४८ किलो वजन गट विजयी- समर्थ शहापूरकर (माळवाडा), उपविजयी- विशाल कुल्लाळ (बुऱ्हाणनगर), तृतीय- अर्जुन जाधव (बुऱ्हाणनगर). ५२ किलो वजन गट विजयी- पारस बिडगर (मांडवे), उपविजयी- शुभम परजने (बीड), तृतीय- देवानंद राऊत (जामखेड). ५५ किलो वजन गट विजयी- जादू सतरकर (गेवराई), उपविजयी- सुरज जाधव (बुऱ्हाणनगर), तृतीय- प्रणव खंडागळे (पुणे). ६० किलो वजन गट विजयी- शुभम लांडगे (वडगाव), उपविजयी- अविनाश गाडे (आष्टी), तृतीय- जयेश जाधव (मालेवाडी). ६५ किलो वजन गट विजयी- शुभम जाधव (नेवासा) उपविजयी- सचिन मुरकुटे (कर्जत), तृतीय- ऋषिकेश उचाळे (शिरपूर). ७४ किलो वजन गट विजयी- सौरभ मराठे (कापूरवाडी), उपविजयी- तुषार खामकर (जामखेड), तृतीय- अभिषेक गहिराळे (बीड). ८४ किलो वजन गट विजयी- महेश फुलमाळी (नेवासा), उपविजयी- ऋषिकेश शेळके (कर्जत), तृतीय- गणेश चव्हाण (कर्जत) खुला गट देवाभाऊ केसरी विजेता- चेतन रेपाळे (पारनेर), उपविजयी- कौतुक डफडे (पुणे), तृतीय- विजय पवार.





# सोनईत कर्करोग तपासणी शिबिर

**नेवासा । विजय खंडागळे**

राज्यात दरवर्षी वाढणाऱ्या कर्करोग रुग्णसंख्येमुळे आणि उपचारासाठी होणाऱ्या हालअपेष्टांमुळे या आजारावर वेळेत निदान व उपचार करणे गरजेचे बनले आहे. याच पार्श्वभूमीवर काल सोनई येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात फिरती कर्करोग निदान व्हॅनद्वारे मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ४७ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यामध्ये १७ पुरुष आणि ३० स्त्रियांचा समावेश होता. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पुढील तपासणी व उपचाराची रूपरेषा ठरवण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये डॉ. काकड, डॉ. बोराडे, डॉ. प्रज्ञा दराडे, डॉ. पुनम भुसारी, डॉ. लोखंडे, तसेच सिस्टर्स, एम.पी.डब्ल्यू. (MPW) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष विधाते यांनी शिबिराचे नियोजन व समन्वय केले.

# आदिक पुण्यतिथीनिमित्त हृदयविकार तपासणी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

महाराष्ट्र कृषक समाज व साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने खा. गोविंदरावजी आदिक यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार ता. ७ जून २०२५ रोजी ''मोफत हृदयविकार व रक्तदाब तपासणी शिबिर'' आयोजित केलेले आहे. या शिबिरासाठी प्रख्यात हृदयरोग तज्ञ डॉ. गौरव वर्मा उपस्थित राहणार आहेत. गंगाधर उगले साखर कामगार रुग्णालयात या शिबिराचा सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गरजूंनी नाव नोंदणीसाठी संपर्क आदित्य आदिक - ९३७१७२२५९९, ९५११११५१८१८, प्रसन्न शेटे - ८६६८९१८५२४, गोपाल वायंदेशकर - ९१७५६७४६३६, साखर कामगार हॉस्पिटल- ०२४२२-२२२६३४ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे.





# लेखणी बंदची दखल न घेतल्याने कृषी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**अहमदनगर । समीर मन्यार**

लिपिक संवर्ग कृषी कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यांसाठी अहिल्यानगर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन केले. प्रलंबित मागण्यांची दखल न घेतल्याने सोमवारपासून ता. २ जून रोजी लेखणी बंद आंदोलन सुरू करण्यात आले होते.

आंदोलनाची दखल न घेतल्याने गुरुवार ता. ५ जूनपासून काम बंद आंदोलन सुरू केले. संघटनेने सरकारकडे निवेदनाद्वारे अनेक मागण्या यापूर्वीच केल्या आहेत. सुधारित आकृतिबंधमध्ये लिपिक संवर्गीय अधिकारी कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध आयुक्तालय ते क्षेत्रिय कार्यालय स्तरावरील कोणतेही पद कमी न करता संघटनेने सुचवलेल्या किफायतशीर व आर्थिक बचतीच्या प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यात यावी. लिपिक संवर्गातील पदोनती स्तर कमी करण्यासाठी सुधारित आकृतिबंधामध्ये सहाय्यक अधीक्षक पद सुधारित मागणीनुसार कक्ष अधिकारी गट ब कनिष्ठ या पदांमध्ये समाविष्ट होण्याबाबत व पदनामात बदल करण्यात मान्यता द्यावी, लिपिक संवर्गीय अधिकाऱ्याचे सुधारित सेवा प्रवेश नियम तयार करावे, लिपिक संवर्गीय प्रति नियुक्तीची पदे चिन्हांकित होऊन त्यास मान्यता देण्यात यावी.

वरिष्ठ लिपिक पदे १०० टक्के पदोन्नतीने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात यावा, सहाय्यक प्रशासन अधिकारी हे पद ७५ टक्के पदोन्नतीने व २५ टक्के सरळ सेवेने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात यावा, इत्यादी मागण्यासाठी धरणे आंदोलन व लेखणी बंद करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी विभाग लिपिक वर्गीय संघटनेच्या अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष आकाश बिल्ला, उपाध्यक्ष स्वप्नील खडामकर, सचिव दत्तात्रय महामुनी यांच्यासह युनुस बेग, विजयकुमार शिंदे, अमित डाके, स्वप्नील पाटोळे, गजानन अकोलकर, मयुरी कडे, जयश्री चव्हाण, सोनाली पवार आणि संघटनेचे सभासद सहभागी झाले आहेत.



# बीएस्सी डाटा सायन्स अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु

**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाबुर्डी घुमट येथील अहिल्यानगर उपकेंद्राच्या नूतन प्रशासकीय इमारतीमध्ये चार वर्षीय बी.एस्सी. डाटा सायन्स अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील परीक्षा गणित विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात रोजगार प्राप्तिसाठी हा चांगला अभ्यासक्रम आहे.विद्यापीठाच्या नव्याने विकसित होत असलेल्या उपकेंद्र अहिल्यानगरच्या बाबुर्डी घुमट येथील सब कॅम्पसमध्ये सुरु होणारा हा पहिलाच अभ्यासक्रम असून अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने शैक्षणिक प्रवेश शुल्क अतिशय कमी ठेवले आहे.तरी प्रस्तुत अभ्यासक्रमास जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद देऊन प्रवेश घेण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्रवेशा संदर्भात अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर उपकेंद्राच्या कार्यलयात संपर्क साधावा किंवा ९७६३५४४५७९ या नंबर वर संपर्क करावा.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शहरालगत करा - आपची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

आम आदमी पार्टीच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहराच्या लगत करण्याची मागणी करुन शहराबाहेर वैद्यकीय महाविद्यालय करण्यास विरोध दर्शविण्यात आला आहे. सदर मागणीसाठी आपचे शहराध्यक्ष भरत खाकाळ यांच्या नेतृत्वाखाली आपच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. याप्रसंगी महिला आघाडी अध्यक्ष ॲड. विद्याताई शिंदे, महासचिव दिलीप घुले, कला-सांस्कृतिक आघाडी अध्यक्ष प्रकाश वडवणीकर, संघटक रवी सातपुते, सहसंघटक विक्रम क्षीरसागर, सचिव सचिन ऐकाडे, पर्यावरण आघाडी अध्यक्ष अजित कटारिया, उपाध्यक्ष अंबादास जाधव, युवा आघाडी अध्यक्ष विजय लोंढे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी मंजूर झालेला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासासाठी नगर शहरालगत सुरू झाले पाहिजे. शिर्डी येथे सदर महाविद्यालय स्थलांतर करण्याचे षडयंत्र सुरू असून, जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणून अहिल्यानगर शहर परिसरात हे महाविद्यालय उपयुक्त ठरणार आहे. यासाठी शहरालगत २५ ते ३० एकर जागाही उपलब्ध आहे. मुख्यमंत्री व संबंधित समितीला आपच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्यात आलेला असून, जनतेच्या सोयीचा व हिताचा विचार करून भूमिका घेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शिर्डीला आधीच एक मोठे हॉस्पिटल असून, हे महाविद्यालय तिकडे नेल्यास संपूर्ण जिल्ह्याचा लाभ मर्यादित राहील. नगर शहरालगत हे महाविद्यालय झाल्यास जिल्हा रुग्णालयाचा उपयोग होईल आणि शहराच्या विकासालाही हातभार लागणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.



**शहरातील अनेक महत्त्वाचे प्रकल्प इतर ठिकाणी पळवून नेण्याचा सपाटा राजकीय पुढाऱ्यांनी लावला आहे. यामुळे शहरालगत आजही विमानतळ होवू शकले नाही. मोठे राजकीय नेते शहराला डावलून आपल्या मतदार संघात प्रकल्प घेवून जात आहे. यामुळे शहराचा विकास खुटला जात आहे. शहरासह जिल्ह्याच्या आरोग्यासाठी आणि मध्यवर्ती ठिकाण म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहरालगत होण्याची आपची भूमिका आहे. वेळप्रसंगी तीव्र आंदोलन छेडण्याची देखील तयारी आहे.**

**-भरत खाकाळ,** शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी